I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** माढा **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0081 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/03/2026 08:31 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** शनिवार **Date from (दिनांक पासून):** 28/03/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 28/03/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 16:45 तास **Time To (वेळेपर्यंत):** 19:59 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 29/03/2026 **Time (वेळ):** 07:50 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 008 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 29/03/2026 08:14 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 07 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** कदम मेडिकल समोरील चौकात , विठ्ठलवाडी ,ता माढा

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** रविंद्र हिम्मत लांभाते

**(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1988 **(d) Nationality (राष्‍ट्रीयत्‍व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| **S. No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्र क्रमांक)** |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्ता प्रकार)** | **Address (पत्ता)::** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , सोलापूर, माढा , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , सोलापूर, माढा , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7038401100

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुदर्शन रमेश जाधव | | | 1. Town/Village (शहर / गाव): मुपो विठ्ठलवाडी,Tehsil (तहसील): ता माढा,Police Station (पोलीस ठाणे): माढा,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|
| | |

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि. 29/03/2026

मी रविंद्र हिम्मत लांभाते, वय - 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 7038401100 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे ऑगस्ट 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.28/03/2026 रोजी आम्ही कार्यालयात असताना दुपारच्या सुमारास तक्रारदार राजकिरण हरिदास सावंत, वय-33 वर्षे, व्यवसाय-शेती/टॅक्टर व जेसीबी, रा. मु.पो. लोंढेवाडी ता. माढा हे समक्ष कार्यालयात आले व आमची भेट घेतली. त्यावेळी तक्रारदार यांचेसोबत त्यांचे चुलत भाऊ रामा श्रीमंत सावंत हे होते. त्यावेळी तक्रारदार यांनी आज रोजी सकाळी कार्यालयाच्या फोन करून पोलीस उप अधीक्षक श्री. चौगुले यांचा मोबाईल नंबर घेऊन त्यांचे मोबाईलवर फोन करून त्यांना लाच मागणी होत असलेबाबत सांगितले होते. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. चौगुले यांनी आम्हा फोन करून तक्रारदार सावंत यांचे लाच मागणीच्या अनुषंगाने पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला आदेश दिले. त्यानुसार आम्ही दि. 28/03/2026 रोजी आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत गट विकास अधिकारी, दक्षिण सोलापूर यांचेशी संपर्क करून दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. सुमारे 16.00 वा चे सुमारास 1) विनायक श्रीकांत कुंचपोर, पद-कनिष्ठ सहायक व 2) जयवंत राजकुमार जाधव, पद- शाखा अभियंता हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी मी दोघा पंचांना माझी ओळख सांगुन तक्रारदार राजकिरण हरिदास सावंत, रा. मु.पो. लोंढेवाडी ता. माढा. जि.सोलापूर यांची ओळख करून देऊन दोन्ही पंचांचे समक्ष त्यांचे तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता "त्यांनी त्यांचे नाव श्री. राजकिरण हरिदास सावंत, वय-33 वर्षे, व्यवसाय-शेती/टॅक्टर व जेसीबी, रा. मु.पो. लोंढेवाडी ता. माढा असे असल्याचे सांगून, त्यांचेकडील ट्रॅक्टर क्र. एम.एच. 45 बी.डी. 0902 यामधुन वाफळे येथील चव्हाण यांचे शेतामधील विहीरीतील उपसा काढून त्यांचेच शेतामध्ये टाकण्याचे काम चालु असताना, तलाठी जाधव व सर्कल नागटिळक यांनी तक्रारदार व इतर दोन ट्रॅक्टर पकडून त्यांचेवर कारवाई न करता सोडून देण्यासाठी तीन्ही ट्रॅक्टर मालकाकडून प्रत्येकी 33,000/- रुपये प्रमाणे 99,000/- रुपये दिल्यानंतरच ट्रॅक्टर सोडणार अन्यथा कारवाई करणार असे सांगुन कारवाई करण्याची भिती दाखविली. त्यामुळे ट्रॅक्टर मालक समाधान खडूळ व मारुती चव्हाण यांनी प्रत्येकी 33,000/- रुपये असे व मी 23,000/- रुपये असे एकूण 89,000/- रुपये तलाठी जाधव व सर्कल नगाटिळक यांनी घेतली व त्यांनी लगेचच पकडलेले ट्रॅक्टर कारवाई नकरता सोडून दिले. माझ्याकडे त्यांना देण्यासाठी 33,000/-रुपये नसल्याने मी त्यांना दि.27/03/2026 रोजी 23,000/- रुपये दिले होते. उर्वरित 10,000/- रुपये उद्यापर्यंत दिले नाहीत तर पुन्हा तुझा ट्रॅकटर पकडून त्यावर कारवाई करेन असे म्हणून तलाठी जाधव यांनी माझ्याकडे उर्वरित 10,000/- रुपये दि.28/03/2026 रोजी देण्याबाबत सांगुन लाचेची मागणी केली आहे. तलाठी जाधव हे मागणी करत असलेली अधिकची लाच (उर्वरित) रक्कम देण्याची इच्छा नाही. तलाठी जाधव त्यांच्याविरूध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी" अशा आशयाची तक्रार सांगुन त्यांची सविस्तर तक्रार स्वःहस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. तक्रारदार राजकिरण सावंत यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणून विनायक श्रीकांत कुंचपोर व पंच क्र. 2 म्हणून जयवंत राजकुमार जाधव यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील पोह/1616 जाधव, पोना/30 नरोटे, चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना बोलावून घेतले आणि दोन्ही पंचांची व

तक्रारदार यांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. त्यानुसार गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हाईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, सील, अँन्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट दिवा इ. सर्व साहित्य ला.प्र.वि कडील शासकीय वाहन एम.एच.12 यु.सी 4108 या वाहनामध्ये ठेवण्यात आले. यादरम्यान तक्रारदार हे त्यांचेकडील रेनॉल्ट कंपनीच्या चारचाकी ट्रीबर वाहन क्र. एम.एच.45 ए.क्यु. 9671 यामधुन त्यांचे चुलत भाऊ रामा सावंत यांचेसह निघाले आम्ही त्यांच्याशी संपर्कात राहून त्यांच्या वाहनाच्या मागे मागे 16.45 वा चे सुमारास शासकीय वाहनातून आम्ही, दोन्ही शासकीय पंच, पथकातील अंमलदार असे सर्वजण आम्ही निघालो. साधारण 17.30 वा. तक्रारदार यांनी त्यांचे वाहन अनगर ता. मोहोळ येथे थांबवले त्यांचे मागे असलेले आमचे शासकिय वाहन थांबवून त्यांना कशासाठी थांबलात याबाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की तलाठी जाधव हे त्यांचे राहते घरी विठठलवाडी येथेच असल्याचे फोनवर कळाले असून, त्यांची भेट विठठलवाडी येथेच होईल असे आम्हास सांगितले. तक्रारदार हे अनगर गावापासून पुढे गेल्यानंतर वाटेत त्यांनी त्यांचे चुलत भाऊ रामा सावंत यांचेकडे चारचाकी वाहन दिले व त्यांना दुचाकी वाहन घेऊन येणेबाबत सांगुन तक्रारदार हे आमचेकडील शासकिय वाहनामध्ये येऊन बसले व आम्ही सर्वजण शासकिय वाहनातून विठठलवाडी ता. माढा या गावामध्ये पोहचलो विठठलवाडी ते माढा रोडवरील काळे शिवारातील पाण्याचा ओढा येथील पुलावर थांबलो.

त्यानंतर आम्ही तक्रारदार सावंत, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील सोनी कंपनीचे IC RECORDER ICDUX570F SV SONY CORP. MADE IN CHINA 1080938 व्हॉईस रेकॉर्डर व NEXUSकंपनीचेे 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर NEXUS MICRO SD HC 8GB त्याच्या मागील बाजूस CE MMC08AX215F-TO DLD XY 2601 MADE IN TAIWAN असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर आणखीन एक NEXUS कंपनीचेे 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर NEXUS MICRO SD HC 8GB त्याच्या मागील बाजूस CE MMC08A8T2F-TO MG XY 2512 MADE IN TAIWAN असे वर्णनाचे मेमरीकार्ड त्याचे पाकीटातून काढून ते मेमरीकार्ड पोना/30 नरोटे यांचे सॅमसंग गॅलक्सी ए-23 कंपनीचे मोबाईलमध्ये टाकून मोबाईलचे स्टोरेज पाथ एस.डी कार्ड सिलेक्ट करण्यात आले जेणेकरून निवेदनाचे व प्राथमिक तपासणीचे व्हिडीओ चित्रीकरण करताना चित्रीकरणाचे फाईल मेमरीकार्डमध्ये जतन होईल. त्यानंतर तक्रारदार सावंत व दोन्ही पंचांचे पडताळणीपुर्व निवेदन 18.35 वा चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले. तक्रारदार आणि पंचांची निवेदने घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून चालक पोकॉ/2026 श्रीराम यांनी केले. त्यांनतर आम्ही तक्रारदार यांना तलाठी जाधव यांना फोन करून विठठलवाडी गावात त्यांची भेट कोठे होईल याबाबत विचारणा करण्यास सांगितले असता, तक्रारदार यांनी त्यांचे मो.क्र. 9689553638 यावरून तलाठी जाधव यांचा मो.क्र. 9766789625 यावर फोन स्पिकर मोडवर ठेवून 18.49 वा. चे सुमारास कॉल केला त्यावेळी तक्रारदार यांनी तलाठी जाधव यांना गावात आल्याचे सांगुन कुठ थांबलात तुम्ही, चौकात हाय ना वरच्या अशी विचारणा करताच तलाठी जाधव यांनी हा थांबा आलोच दहा मिनीटात असे बोलून फोन कट केला. सदरवेळी आम्ही तक्रारदार यांचेसमोर व्हॉईसरेकॉर्डर धरून त्यांचे मोबाईल फोनवरील बोलणे रेकॉर्ड करून घेतले आहे. त्यानंतर तक्रारदार सावंत व पंच क्र.1 कुंचपोर यांना

पडताळणीकामी योग्य त्या सुचना देऊन 18.53 वा चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डर चालु करून, होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार यांचे शर्टाच्या आतील बनियनमध्ये घालून त्यांचे गळ्यामध्ये अडकवला त्यानंतर आम्ही विठ्ठलवाडीकडे रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 01 हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 19.12 वा चे सुमारास परत आले. पडताळणी दरम्यान तलाठी जाधव यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचे पकडलेले ट्रॅक्टर दि.27/03/2026 रोजी कारवाई न करता सोडून दिले त्यावेळी 23,000/- रुपये घेतल्याचे कबूल करून उर्वरित 10,000/- रुपये लाचेची मागणी केली. पडताळणी दरम्यान तक्रारदार यांनी नमस्ते असे तलाठी जाधव यांना बोलले असता तलाठी जाधव यांनी नमस्ते काय तुम्ही मधी आदी बी कॉन्टॅक्ट नाही डायरेक्ट तुम्ही पकडल्यावरच मला बोलताय मग मलाबी ते सर्कल आलेत मलाबी बोलता येत नाही.. त्यांना अस होतय त्यावर तक्रारदार यांनी आओ सर्कलचा विषय नाही पण तुम्ही मला सांगा तुम्ही मधीच धरलयं, मला सांगा तुम्ही... आता तुम्हाला रात्री तेवीस दिलेत .. तुम्हाला दहाला तुम्ही इतक वेड्यासारख केलयं  करताव.. असे तलाठी जाधव यांना बोलून चर्चा करत असताना तलाठी जाधव यांनी हे तुम्हाला दहा द्याव्याच लागतात.. नाही मी...माझ्या पर्यंत विषय असता तर मी
तर काय बोललो सुद्धा नसतो पण उग..तुम्ही मी होतो म्हणून तेवढ हे तर झाल थांबल तरी... नाहीतर असे बोलून व दोन्ही हाताच्या इशा-याने तक्रारदार यांचेकडून 10,000/- रुपचे लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी आता तेहतीस... ऐका ऐका आता तेहतीस म्हणलं असे बोलून 33,000/- रुपयाबाबत बोलले असता, तलाठी जाधव यांनी हा बरोबर हाय सगळ तुमच पण आता ते ठरलयं की एकदा बोलता येत नाही काय असे बोलून यापुर्वी 33000/-रुपये ठरलेपैकी 23,000/- रू स्वीकारल्याचे मान्य करून 10,000/- रू लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर विठ्ठलावाडी ते माढा रोडवरील काळे शिवारातील पाण्याचा ओढा येथेच शासकीय वाहनामध्ये तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक लिहून घेणे, तक्रारदार व दोन्ही पंचांना अँन्थ्रासीन पावडरची माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करणे व हजर केलेल्या नोटांना पावडर लावणे इ. सापळापुर्व कारवाई करून, तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाईच्या अनुषंगाने वर नमुद मेमरीकार्डमध्ये 19.27 वा व्हॉईसरेकॉर्डरव्दारे निवेदन रेकॉर्ड करून घेतले. सदरचे निवेदन रेकॉर्ड करून घेताना चापोकॉ/2026 श्रीराम यानी पोना/नरोटे यांचे मोबाईलमधून वर नमुद मेमरीकार्डमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदारांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार सावंत व पंच क्र.1 कुंभपोर यांना तलाठी जाधव यांची भेट घेण्यासाठी  19.45 वा व्हॉईसरेकॉर्डर चालु करून, होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार यांचे शर्टाच्या आतील बनियनमध्ये घालून त्यांचे गळ्यामध्ये अडकवला व त्यांना विठ्ठलवाडी येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही स्वत:, पंच क्र.2, पोहेकॉ/1616 जाधव, पोना/30 नरोटे व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे शासकीय वाहनातून विठ्ठलवाडी दिशेने रवाना झालो.

सापळा कारवाईदरम्यान तक्रारदार सावंत व पंच क्र.1 कुंभपोर हे दोघे विठ्ठलवाडी गावातील कदम मेडिकल समोरील चौकात जाऊन थांबले व तलाठी जाधव यांना फोन करून कदम मेडिकल समोरील चौकात बोलावून घेतले. तलाठी जाधव हे विठ्ठलवाडी येथील कदम मेडिकल समोरील चौकात आले त्यावेळी तक्रारदार यांनी माझं म्हणण हाय.. या दहा हजार रुपयातुन पैसे कमी करावत असे तलाठी

जाधव यांना बोलून तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता, तलाठी जाधव यांनी ते वरन माझ्यान काय नाही ओ माझ्या जवळ अस म्हणजे ... मी जर वरिष्ठ असतो का, मी सर्कल असतो का.. असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी एवढ तंग करून नाही मेळ खात असाच...कस तुमच्या हिशोबान बघा तुम्ही.. असे तलाठी जाधव यांना बोलले असता, तलाठी जाधव यांनी नाही ते तेवढ करावच लागतयं त्यांना सांगितलयं कस करायचं काय करायचं, तेवढ ती करावचं लागतयं असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी मित्र हाय मग ऐका.. मित्र हाय मला सांगा मित्रापायी तुम्ही थोडफार कमी करायला पाहिजे का नाही या दहा हजारातल असे बोलून तडजोड करण्याचा पुन्हा प्रयत्न केला. त्यावर तलाठी जाधव यांनी हं हं माझ्या हातात असल्यावर मी कमी केल असतं ओ.. माझ्या माझ काय सांगा बर असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी मला सांगा ... तुमच्या हिशोबात तुमचा साक्षीनच सगळ पैसे दिलेत बराबर हाय..असे बोलून पुर्वी घेतलेल्या 23000/- रुपयांची आठवण करून दिली. त्यावर तलाठी त्यावर तलाठी जाधव यांनी हं मी.. असे बोलून पुर्वी घेतलेल्या 23000/- रुपयांची कबुली दिली. एक रुपया सुध्दा मी घेतला नाही..एक रुपया सुध्दा मला मिळाला नाही..एक सुध्दा रुपया तुमचा मला मिळाला नाही मी शप्पथ घेऊन सांगतो असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी आता या तेहतीस हजार रुपयाचं..अशी तालाठी जाधव यांना विचारणा केली असता, तलाठी जाधव यांनी माझ्या हातात असत तर ती तुम्हाला म्हणल नाय असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी म्हणजे दहा हजार द्यायचेच तुम्हाला असे तलाठी जाधव यांचेकडे विचारणा केली असता, तलाठी जाधव यांनी मी शप्पथ घेऊन सांगितले की, मी तुम्हाला म्हणल की, मला आता तुम्ही भेटलाव हे करा म्हणून मला इथन पूढं काय इन्फॉर्मेशन मिळाली की, मी तुम्हाला फोन करून सांगेन माझा वैयक्तीक काहीच फायदा नाय राव..माझा असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी मग पैसे कसे तुम्हाला घ्या म्हणाले ते.. अशी तलाठी जाधव यांना विचारणा केली असता, तलाठी जाधव यांनी कोण ? ते आता मग रात्री ..... सकाळी मला फोन आलता ओ साहेब ... भाऊसाहेबांना किती फोन आलेत सांगू तुम्हाला .. दाखवु का तुम्हाला ... त्यान पाठवले का नाही... हे नाही... काय नाही.. हे बघा बालाजी नागटिळक .....बालाजी नागटिळक सकाळी फोन सकाळपासुन फोन बालाजी नागटिळक साहेबांना जातेत ओ पैसे... वर साहेबांना पैसे जातेत... माझ्या हातात असे बोलून तलाठी जाधव यांनी हाताचा इशारा करून पंचाचे समक्ष तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी त्यांचे शर्टाचे खिशातून अँथ्रासिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम काढून तलाठी जाधव यांचे समारे धरली व त्यांना मोजून घ्या बघा दहा आहेत असे तक्रारदार यांनी तलाठी जाधव यांना लाच रक्कम देऊन मोजून घेण्याबाबत सांगितले. त्यावर तलाठी जाधव यांनी असत्याल.. काय मग हायत ना.असे बोलून असतील की असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी मोजा की दहा हजार ... तुम्हाला कशाला आजुन शंका ...तुमी आता रुपया बी कमी करीनाय दहा हजारातला असे तलाठी सांगितले. त्यावर तलाठी जाधव यांनी मी तुम्हाला खर सांगतोय माझी मी शपथ घेतली की नाही..मी एक रुपया सुद्धा मी घेतलेला नाही..तुम्हाला आजून खोट वाटत... तुम्हाला आजुन खोट वाटत असणार काय त्याला... मला त्याला... त्या सचिनला माझ कसय एक दुसरा एक मित्र होता खैरवाडीचा आणि आम्ही एक दोन दिवस तिथ बसलेलो माढ्यात म्हणून मला त्याची थोडी ओळख होती... जरा मग मी त्या मित्राला सांगितलं बाबा.....त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचा डावा हात

डोक्यावरून फिरवून लाच स्वीकारल्याचा इशारा दिला. त्यावेळी त्या परिसरात सापळा लावून थांबलेले आम्ही सर्वजण तलाठी जाधव यांना 19.59 वा चे सुमारास रंगेहात ताब्यात घेतले. तलाठी जाधव यांना ताब्यात घेण्यात आल्यावर सदरठिकाणी त्यांचे काळया रंगाच्या पॅन्टच्या पाठीमागील खिशात ठेवलेली लाच रक्कम पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आली, त्यानंतर पंच क्र.2 जयवंत जाधव यांनी सदर नोटांच्या क्रमांकाची तपासणी केली असता ते तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळून आले. त्यानंतर सदर ठिकाणी अंधारातच तलाठी जाधव यांच्या दोन्ही हाताची, पॅन्टच्या खिशाची व त्यांच्या ताब्यातून मिळालेल्या नोटांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी करता त्यावर अँन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. तलाठी जाधव यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. प्राथमिक तपासणीचे व्हिडीओ चित्रीकरण पोना/नरोटे यांनी त्यांचे मोबाईलमध्ये केले. त्यानंतर आरोपी लोकसेवक सुदर्शन रमेश जाधव यांना ताब्यात घेवून सापळा पथकासह शासकीय विश्रामगृह, माढा येथे आल्यावर सदर ठिकाणी संभाषणाचा उतारा काढून सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला.

तरी दि.28/03/2026 रोजी तक्रारदार राजकिरण हरिदास सावंत यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.28/03/2026 रोजी 16.45 वा. पासून 19.59 वा. चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईदरम्यान वाफळे येथील तलाठी सुदर्शन रमेश जाधव यांनी तक्रारदार यांचे ट्रॅक्टरवर कारवाई न करता सोडून दिल्याने ठरलेल्या 33,000/- रुपयापैकी दि.27/03/2026 रोजी घेतलेल्या 23,000/- रुपयांची कबुली देऊन, उर्वरित 10,000/- रू स्वत: करीता व त्यांचे वरिष्ठांकरीता लाच मागणी केली. त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान तलाठी जाधव यांनी तक्रारदार यांच्याकडून 10,000/- रू लाचेची रक्कम स्वत: करीता व त्यांचे वरिष्ठांकरीता स्वीकारुन कायदेशिर परिश्रमाखेरीज अवैध पारितोषण स्विकारून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणून सुदर्शन रमेश जाधव, वय 30 वर्षे, पद- तलाठी, सजा- वाफळे ता. मोहोळ, जि. सोलापूर, रा: मु.पो. विठ्ठलवाडी, ता. माढा जि. सोलापूर यांचेविरूध्द मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 7अ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला.

पोलीस ठाणे अंमलदार
माढा पोलीस ठाणे

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1) Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** rohit chandrasen shinde (पोलीस उपनिरीक्षक) **or (किंवा):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** rohit chandrasen shinde

**Rank (हुद्दा):** SI (Sub-Inspector)

**No. (क्र.):** DGPRCSM8803

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1996 | | - | | चेचकः क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**